आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२३ जून २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपतींच्या हस्ते दुसऱ्या टप्प्यातल्या पद्म पुरस्कारांचं वितरण/ महाराष्ट्रातले लोककलावंत भिकल्या धिंडा यांचा समावेश

- महाराष्ट्रातल्या प्रत्येक पोलीस ठाण्यात अंमली पदार्थविरोधी कृती दलाची स्थापना करण्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन

- विदर्भातल्या प्रत्येक जिल्ह्यात व्याघ्रप्रकल्प तसंच कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि खानदेशातल्या प्रत्येक जिल्ह्यात बिबट्या सफारी सुरू करण्याची वनमंत्र्यांची घोषणा

- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित १७ आमदारांनी घेतली सदस्यत्वाची शपथ

**आणि**

- ISSF ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतीय नेमबाजांची दोन रौप्य आणि एका कांस्य पदकाची कमाई

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्या हस्ते आज दुसऱ्या टप्प्यातल्या पद्म पुरस्कारांचं वितरण झालं. साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रासाठी पी. नारायणन यांना आणि समाज कार्यांसाठी माजी न्यायाधीश न्यायमूर्ती के. टी थॉमस यांना पद्मविभूषणानं सन्मानित करण्यात आलं.

क्रीडाक्षेत्रासाठी,  टेनिसपटू  विजय अमृतराज, हॉकीपटू  सविता पुनिया यांचा पद्मभूषण प्रदान करून गौरव करण्यात आला. कलाक्षेत्रातला पद्मभूषण पुरस्कार संगीतकलेसाठी अलका याज्ञिक तर लोककलेसाठी वेलापल्ली नटेशन आणि अभिनयासाठी मल्याळम अभिनेते माम्मूटी या मान्यवरांना मिळाला.

महाराष्ट्रातल्या मान्यवरांमध्ये क्रिकेटपटू रोहित शर्मा तर नवजात बालक चिकित्सातज्ज्ञ अर्मिडा फर्नांडिस यांना पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. अभिनेता आर. माधवन आणि तारपा वादनासाठी प्रसिद्ध वारली लोककलावंत भिकल्या लाडक्या धिंडा यांना कलाक्षेत्रातली पद्मश्री मिळाली. उद्योजक डॉ. अशोक खाडे यांना उद्योग क्षेत्रासाठी पद्मश्री देण्यात आली. दिवंगत अभिनेते सतीश शाह यांना जाहीर झालेला पद्मश्री पुरस्कार त्यांच्या बंधूंनी स्वीकारला. यावर्षी एकूण एकशे एकतीस पद्म पुरस्कार जाहीर झाले. यापैकी दोन पद्मविभूषण, ६० पद्मभूषण आणि ५६ पद्मश्री आज वितरीत झाले.

**<><><><><>**

केंद्रीय खाण मंत्रालयानं ५६ महत्त्वपूर्ण आणि धोरणात्मक खनिज ब्लॉक्स तसंच ११ शोध परवाना ब्लॉक्सचा यशस्वी लिलाव केला आहे. मंत्रालयानं आतापर्यंत उपलब्ध करून दिलेल्या ८८ ब्लॉक्सपैकी ५६ ब्लॉक्सचा लिलाव पूर्ण झाला आहे. केंद्र सरकारनं प्रथमच गुजरात, उत्तराखंड आणि तेलंगणा इथल्या महत्त्वपूर्ण खनिज ब्लॉक्सचा लिलाव केला असून या टप्प्यात ग्रेफाइट, दुर्मिळ पृथ्वी खनिजं, टायटॅनियम यांसारख्या खनिजांचा समावेश होता. याशिवाय, मंत्रालयानं नव्या व्यवस्थेअंतर्गत आतापर्यंत ११ अन्वेषण परवाना ब्लॉक्सचा लिलाव केला असून अरुणाचल प्रदेश, उत्तर प्रदेश आणि ओदिशा इथल्या प्रथमच लिलाव झाले. या लिलावांमुळे स्वच्छ ऊर्जा, संरक्षण क्षेत्र आणि प्रगत उत्पादन उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या महत्त्वपूर्ण खनिजांच्या शोध आणि विकासाला गती मिळणार आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या प्रत्येक पोलीस ठाण्यात अंमली पदार्थविरोधी कृती दलाची स्थापना करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिलं. या कृती दलात उत्तमोत्तम अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल, त्यांना भ्रष्टाचारविरोधी पथक आणि नक्षलविरोधी पथकाप्रमाणे भत्ते आणि पदोन्नती दिली जाईल असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट सीएम**

ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत जास्त अंमली पदार्थ सापडतील तिथल्या पोलीस निरीक्षकावर कारवाई करण्याचा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला.

एप्रिल २०२६ पर्यंत राज्यात अंमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी १ हजार १४२ गुन्हे दाखल झाले, त्यापैकी १ हजार ६२६ आरोपींना अटक झाली. त्यात २५४ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त झाले असून अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांविरुद्ध ३ हजार १९९ गुन्हे दाखल झाल्याची माहिती सरकारने लेखी उत्तरात दिली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.

**विदर्भातल्या** प्रत्येक जिल्ह्यात व्याघ्र प्रकल्प तसंच कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि खानदेशातील प्रत्येक जिल्ह्यात बिबट्या सफारी सुरू करण्याची घोषणा वन मंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या दरम्यान केली. वन्यजीवांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबातल्या सदस्यांना कायमस्वरूपी नोकरी देण्याचा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळाच्या समोर सादर केला जाईल असं आश्वासन नाईक यांनी दिलं.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी आज झाला. प्राजक्त तनपुरे, रवींद्र फाटक, अनिकेत तटकरे, दुष्यंत चतुर्वेदी, विक्रम काकडे, अरुण

लखानी, बसवराज पाटील, प्रवीण पोटे, अमरनाथ राजूरकर, राजेंद्र राऊत, धैर्यशील कदम, गोकुळ गीते, राजीव पोतदार, अविनाश ब्राह्मणकर, नंदकिशोर महाजन आणि सुहास शिरसाट यांना सभापती राम शिंदे यांनी सदस्यत्वाची शपथ दिली.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यावरून ५८ टक्के करायचा निर्णय घेतल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत केली. तर वार्षिक वेतनवाढीचा दर २ वरून ३ टक्के करायची घोषणाही त्यांनी केली. यानंतर २९ जून रोजी एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेलं धरणं आंदोलन मागे घेतल्याचं सरनाईक यांनी जाहीर केलं.

दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी दूधभेसळ अधिनियम तयार करायचं काम सुरू असून त्यात भेसळीच्या गंभीरतेनुसार ६ महिने ते आजन्म तुरुंगवास आणि १० लाख रुपयांच्या दंडाची तरतूद प्रस्तावित आहे, अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी आज विधानपरिषदेत दिली.

**<><><><><>**

जर्मनीत सुहल इथं सुरू असलेल्या ISSF ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतीय नेमबाजांनी आज दोन रौप्य आणि एका कांस्य पदकाची कमाई केली. शिव नरवालला पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्टल ज्युनियर प्रकारात रौप्य पदक मिळालं तर याच प्रकारात युग प्रताप सिंग राठोडनं  कांस्य पदक पटकावलं.

भारतानं पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्टल ज्युनियर सांघिक प्रकारातही रौप्य पदक जिंकलं. या स्पर्धेत भारताची एकूण पदकसंख्या १५ वर पोहोचली असून, यात पाच सुवर्ण, तीन रौप्य आणि सात कांस्य पदकांचा समावेश आहे.

**<><><><><>**

फिफा विश्वचषक स्पर्धेत आज गट-फेरीतले महत्वाचे सामने होत असून, नॉकआउट फेरीत स्थान मिळवण्यासाठी सर्व संघ शर्थीची झुंज देतील. अमेरिकेत ह्युस्टन इथं गट 'के'  मध्ये, ख्रिस्टियानो रोनाल्डोचा संघ उझबेकिस्तानचा सामना करेल. सलामीच्या सामन्यात बरोबरी पत्करावी लागल्यानंतर हा संघ आता पुनरागमन करण्यासाठी मैदानात उतरेल. हा सामना रात्री साडे-दहा  वाजता सुरू होईल.

अमेरिकेत बोस्टन इथं भारतीय वेळेनुसार मध्यरात्री दीड वाजता गट 'एल' मध्ये, इंग्लंड आणि घाना यांच्यात लढत होईल. कॅनडात टोरंटो इथं पहाटे साडे-चार वाजता 'गट एल' मधल्या आणखी एका सामन्यात, क्रोएशियाचा सामना पनामाशी होईल. त्यानंतर, उद्या सकाळी साडे-सात  वाजता ग्वाडलहारा इथं 'गट के' मधल्या सामन्यात कोलंबियाचा सामना डीआर काँगोशी होईल.

**<><><><><>**

भारत, अमेरिका आणि इराण यांच्यातला सामंजस्य करार यशस्वी होईल अशी आशा असल्याचं राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं आयोजित ब्रिक्स देशांच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार बैठकीत ते आज बोलत होते. या करारामुळे होर्मूझची सामुद्रधुनी वाहतुकीसाठी खुली होऊन जागतिक ऊर्जा सुरक्षेला बळ मिळेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी मंगोलिया दौऱ्यादरम्यान मंगोलियाचे परराष्ट्रमंत्री आणि उद्योगमंत्री यांची भेट घेतली. जयशंकर यांनी भारत-मंगोलिया मैत्रीचे प्रतीक असलेल्या 'मंगोल रिफायनरी' प्रकल्पाच्या बांधकाम स्थळाला भेट देऊन कामाचा आढावा घेतला. हा प्रकल्प वेगानं प्रगती करत असल्याचं त्यांनी सांगितलं. त्यांनी आव्हानात्मक परिस्थितीत काम करणाऱ्या भारतीय आणि मंगोलियन कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या वचनबद्धतेचं कौतुक केलं.

**<><><><><>**

भारतीय नौदलाचं 'आयएनएस उदयगिरी' हे युद्धजहाज आणि 'आयएनएस कावरत्ती' ही पाणबुडीविरोधी युद्धनौका अशी दोन्ही जहाजं व्हिएतनामच्या न्हा रोंग बंदरात पोहोचली आहेत. आग्नेय आशियातल्या त्यांच्या मोहिमेचा हा एक भाग आहे. व्हिएतनामच्या नौदलानं या जहाजांचं खूप जोरदार आणि उत्साहात स्वागत केलं. या स्वागतातून दोन्ही देशांमधले दृढ संबंध आणि सागरी मैत्री दिसून येते, असं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं. या दौऱ्यात दोन्ही देशांचे नौदल अधिकारी एकमेकांशी चर्चा करतील, एकमेकांच्या जहाजांना भेटी देतील, सोबतच खेळांचे सामने आणि सामाजिक उपक्रमही राबवणार आहेत.

**//<><><><><>//**